दै. पुण्यनगरी

# बालकाला भोसकणाऱ्या युवकाला ३ वर्षे सक्त मजुरी

## १० हजार रुपये दंड

**नांदेड/प्रतिनिधी**

एका १३ वर्षीय बालकावर चाकुने हल्ला करणाऱ्या २५ वर्षीय युवकाला नांदेडच्या मुख्य न्यायदंडाधिकारी किर्ती जैन देसरडा यांनी ३ वर्ष सक्त मजुरी व १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.



दि. १४ एप्रिल २०१४ मध्ये खडकपुरा येथील युवक शेख जावेद शेख रहिम हा कलामंदीरजवळ पिंपळाच्या झाडाखाली उभा राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची मिरवणूक पाहत असताना त्याचा धक्का गर्दीमध्ये एका युवकाला लागला. मला धक्का का मारलास असे म्हणून त्या युवकाने शेख जावेद शेख रहीमच्या पोटात चाकू खुपसला. बंदोबस्तातील पोलिसांनी त्या युवकाला ताब्यात घेतले. सुरज अरविंद हटकर (२५, रा.देगाव चाळ) याने शेख जावेद याला चाकू मारला. यानंतर शेख जावेदच्या तक्रारीवरुन ६३/१४ नुसार भादंविच्या कलम ३२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा सखोल तपास करुन पोलीस उपनिरीक्षक भीमराव भद्रे यांनी सुरज अरविंद हटकर याच्या विरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. न्या.किर्ती जैन-देसरडा यांनी उपलब्ध साक्षीपुरावे तपासून सुरज हटकर याला दोषी ठरवित ३ वर्ष सक्तमजुरी आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. या खटल्यात सौ. एस.डी.जोहिरे यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. पोलीस अंमलदार बालाजी लांबतुरे आणि सीमा वच्छेवार यांनी पैरवी अधिकाऱ्यांची जबाबदारी पुर्ण केली.

दै. सकाळ दि. 12/05/23

# तामसा पोलिसांमुळे मिळाले दहा गायींना जीवदान

## दोघांवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**तामसा, ता. ११ (बातमीदार) :** तामसा पोलिसांच्या सतर्कतेमुळे कत्तलखान्याकडे जाणाऱ्या दहा गाईंची सुटका झाली आहे. बुधवारी (ता. दहा) रात्री पावणे अकराच्या सुमारास तामसा पोलिसांनी ही कार्यवाही केली आहे.

हदगावकडून मुदखेडकडे जाणाऱ्या वाहनांमध्ये गाईंची अवैधरीत्या वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सहाय्यक पोलीस निरीक्षक मुंजाजी दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार बालाजी किरवले व जमादार ज्ञानेश्वर टिमके यांनी संबंधित वाहनावर पाळत ठेवली. तामसाजवळ वाहनाला अडविले असता वाहन चालकाने वाहन सोडून पळ काढला. पोलिसांनी वाहन ताब्यात घेऊन आरोपी आयान अजीज कुरेशी (रा. हदगाव) आणि फरार झालेला वाहनचालक पाशा कुरेशी (रा. उमरखेड) या दोघांविरुद्ध प्राणी छळ प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करून गुन्हा दाखल केला आहे. ताब्यात घेतलेल्या गाई व वाहन असा सव्वा पाच लाख रुपयांचा मुद्देमाल या कारवाईत जप्त झाला आहे.

पुढील तपास बीट जमादार पंडित कल्याणकर करत आहेत. या कारवाईमुळे संबंधिताचे धाबे दणाणले असून तामसामार्गे गोवंशाची मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक रोखण्यासाठी स्थानिक मध्यस्थाविरुद्ध कारवाई होऊन या प्रकाराला चाप घालण्याची मागणी गोप्रेमींकडून होत आहे.